पोलीस निरीक्षक सटाणा पोलीस ठाणे(नाशिक ग्रा.)

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** सटाणा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0028 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/01/2025 02:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 10/01/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/01/2025
**Time From (वेळेपासून):** 14:42 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/01/2025 **Time (वेळ):** 00:05 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/01/2025 02:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** राष्ट्रीय महामार्ग 752जी ,ताहराबाद रोड दोधेश्नर नाका, गवळी भेळ सेंटरच्या समोर सटाणा,सटाणा जि नाशिक
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. चंद्रशेखर अरविंद पाठक

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ताहराबाद, ता बागलाण,बागलाण,सटाणा,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ताहराबाद, ता बागलाण,बागलाण,सटाणा,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9420366564

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र दगा म्हसदे | | | 1. न्यु प्लट, कचेरी रोड, सटाणा, , सटाणा, ,सटाणा,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराची भारतीय चलनाची नोट. | 500.00 |



Scanned with OKEN Scanner

पोलीस निरीक्षक (ग्रा.) सटाणा पोलीस ठाणे (नाशिक ग्रा.)

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद सटाणा पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण
दिनांक - 11/01/2025

माझे नांव श्री. चंद्रशेखर अरविंद पाठक, वय- 37 वर्षे, धंदा- पद प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद शाळा, नांदिन, पंचायत समिती बागलाण, राहणारः- ताहराबाद, ता. बागलाण, जि. नाशिक मोबाईल नंबर 9420366564

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरिल ठिकाणी माझे आई व वडील नामे श्री. अरविंद रामकृष्ण पाठक, पत्नी, मुले, भाऊ यांचेसह एकत्रित कुटुंबात वास्तव्यास असुन मी दि. 11/08/2009 रोजी पंचायत समिती बागलाण, जि. नाशिक येथे शिक्षक म्हणुन नोकरीस लागलो असुन माझी सध्या नेमणुक जिल्हा परिषद शाळा, नांदिन, ता. बागलाण, जि. नाशिक येथे आहे. माझे वडील नामे श्री. अरविंद रामकृष्ण पाठक यांना मुत्राशयाचा आजार असुन त्यांची तब्येत खालावल्याने दिनांक 17/07/2024 ते दिनांक 19/07/2024 व दिनांक 03/09/2024 ते दिनांक 05/09/2024 रोजी दरम्यान उपचार कामी मी श्री. डॉ. अनिरूध्द ढोकरे यांचेकडे सोहम हॉस्पिटल, नाशिक येथे त्यांना आंतररूग्ण म्हणुन दाखल केले होते. त्याचे वरिल नमुद दोन्ही वेळचे उपचाराचे बील अनुक्रमे 99683/- रूपये व 82772/- रूपये वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती मिळणेकामी मी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, बागलाण यांना सादर केले असुन सदर बील मंजुर करणेकामी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे पाठविणे आहे. सदर बील मी दिनांक 11/11/2024 रोजी पंचायत समिती, बागलाण, शिक्षण विभाग येथे जमा केले असुन सदर बील जिल्हा परिषद, नाशिक कडे पाठविणेसाठी पंचायत समिती बागलाण येथे लिपीक नामे श्री. रविंद्र म्हसदे यांचे कडे प्रलंबित आहे. सदर बील जिल्हा परिषद नाशिक कडे पाठविणेसाठी मी त्यास दिनांक 3 जानेवारी 2025 रोजी भेटलो असता त्यांनी माझ्या वडीलांच्या वैद्यकिय बीलाच्या फाईल हया कार्यालयात मिळुन येत नसल्याचे कारण मला सांगुन सदर वैद्यकिय बीलाच्या फाईल ह्या गटशिक्षणाधिकारी यांचेकडुन शिक्षणाधिकारी यांचेकडे जावक क्रमांक नोंदवुन पाठविण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे 500 (पाचशे) रूपये लाचेची मागणी केली. माझे काम कायदेशीर असुन मी लिपीक नामे श्री. रविंद्र म्हसदे यास कोणतीही रक्कम देणे लागत नसुन माझ्यात आणि त्यांच्यात कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार नाही. तसेच वैर नाही.

मी आज दि. 10 जानेवारी 2025 रोजी लिपीक नामे श्री. रविंद्र म्हसदे यास माझ्या वडीलांच्या वैद्यकिय बीलाच्या फाईल ह्या शिक्षणाधिकारी प्राथमिक जि. प. नाशिक यांचेकडे पाठविण्याची विनंती करण्यासाठी जाणार आहे. त्यावेळी ते माझे काम (सदर वैद्यकिय बीलाच्या फाईल शिक्षणाधिकारी, जि. प. नाशिक यांचेकडे पाठविण्यासाठी) करून देण्याचे मोबदल्यात माझ्याकडे लाचेची मागणी करतील व मी त्यांना लाच न दिल्यास ते माझे वडीलांच्या वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती बीलाची फाईल शिक्षणाधिकारी, जि. प. नाशिक कडे पाठविणार नाहीत. माझी त्यांना लाच देण्याची इच्छा नसुन मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे पडताळणी करून योग्य ती कार्यवाही करण्यासाठी मी दिनांक 10/01/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोलीस निरीक्षक संदिप घुगे यांचेकडे स्वः हस्ताक्षरात लेखी तक्रार दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने श्री. संदीप घुगे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांनी दिनांक 10/01/2025 रोजी रविंद्र दगा म्हसदे हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची पडताळणी करणेकामी मला व पंच क्रमांक 1 श्री. प्रदिप जाधव यांचेसह पडताळणी कारवाईकामी आवश्यक त्या सुचना देवून माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवून माझे कडील फोर व्हिलर कारने पंचायत समिती कार्यालय, बागलाण येथे पाठविले. त्यावरून मी व पंच क्रमांक 1 श्री. प्रदिप जाधव असे कारने पंचायत समिती कार्यालय, बागलाण येथे गेलो असता तेथे माझी व लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे, लिपीक/कनिष्ठ सहाय्यक यांची भेट झाली. त्यावेळी मी माझ्या वडीलांच्या वैद्यकिय उपचारासाठी खर्च झालेल्या रक्कमेच्या वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती साठी जमा केलेल्या फाईलवर त्यांनी जावक क्रमांक टाकला अगर कसे ? याविषयी संभाषण केले असता त्यांनी यापुर्वी



Scanned with OKEN Scanner

मला मी जमा केलेल्या वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती मिळणेकामी सादर केलेल्या फाईल ह्या कार्यालयात मिळुन येत नसल्याचे कारण मला सांगितलेले असल्याने मी लोकसेवक नामे रविंद्र म्हसदे यांना '' सापडल्या का फाईल '' असे बोलुन माझ्या वडीलांच्या वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयक मंजुरीच्या फाईल सापडल्या का ? अशी विचारणा केली असता लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे यांनी मला '' सापडल्या, सापडल्या त्या '' असे बोलुन माझ्या वडीलांच्या वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयक मंजुरीच्या फाईल सापडल्या असे सांगुन लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे यांनी मला '' ते नंबर बिंबर टाकी ठिया '' असे अहिराणी भाषेत मला सांगुन वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयक मंजुरीच्या फाईलवर जावक नंबर टाकला आहे असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना '' हं '' असे म्हणालो असता लोकसेवक नामे रविंद्र म्हसदे यांनी मला '' दया तुमने देता येई ते '' असे अहिराणी भाषेत म्हणुन माझ्या वडीलांच्या वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयक मंजुरीच्या फाईलवर जावक क्रमांक टाकुन सदरील फाईल माझ्या ताब्यात देण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना '' किता तरी '' असे बोलुन लाच म्हणुन किती रक्कम दयावी लागेल याबाबत विचारणा केली असता लोकसेवक नामे रविंद्र म्हसदे यांनी मला '' दया तुमने मना '' असे म्हणुन तुम्हाला योग्य वाटेल तेवढी रक्कम लाच म्हणुन देण्यास सांगितले. परंतु लोकसेवक नामे रविंद्र म्हसदे यांनी लाचेची निश्चित रक्कम मागितली नसल्याने मी पुन्हा त्यांना '' नही तुम्ही सांगाना, तुम्ही बोलाना '' असे बोलुन लाचेची रक्कम किती द्यावी लागेल बाबत त्यांना विचारले असता लोकसेवक नामे रविंद्र म्हसदे यांनी मला '' पाच एक शे देई दया '' असे अहिराणी भाषेत बोलुन माझ्याकडे पाचशे रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी खात्री होण्यासाठी पुन्हा लोकसेवक नामे रविंद्र म्हसदे यांना '' किती पाचशे रूपये '' असे बोलुन पाचशे रूपये लाच म्हणुन द्यावे लागतील का ? अशी विचारणा केली व '' तुम्ही काढुन ठेवा, मी देतो तुम्हाला, पाकीट नेमकं गाडीत राहिलं '' असे म्हणालो असता लोकसेवक नामे रविंद्र म्हसदे यांनी '' चालेल, चालेल '' असे म्हणाले. त्यावर मी सदर ठिकाणाहुन निघुन सापळा पथक थांबुन असलेल्या ठिकाणी आलो व त्यांना घडलेली हकिगत सांगुन लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे यांनी माझ्या वडीलांच्या वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयक मंजुरीच्या फाईल गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, बागलाण येथुन शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे जावक क्रमांक नोंदवुन माझ्या ताब्यात देण्याच्या मोबदल्यात माझेकडे 500/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे, लिपीक/कनिष्ठ सहाय्यक यास लाच म्हणुन देणेकामी हजर केलेल्या लाचेच्या 500/- रूपये दराच्या 1 चलनी नोटेस अॅन्थ्रासीन पावडर लावुन लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे यांनी माझ्याकडे लाचेची रक्कम मागितल्यास त्यांना देणेकामी माझ्याकडे दिले व लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे यांची भेट झाल्यानंतर त्यांनी मागणी केल्यावर अॅन्थ्रासीन पावडर लावलेली 500/- रूपये दराची चलनी नोट देण्यास सांगितले व लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे यांनी लाच स्विकारल्यास पडताळणी व सापळापुर्व पंचनाम्यात ठरल्याप्रमाणे पुर्वनियोजित
शारा करणे बाबत सांगितले. सदर बाबत पोलीस निरीक्षक संदीप घुगे व त्यांच्या सोबत असलेल्या सापळा पथकाने सविस्तर लाच मागणी पडताळणी व सापळापुर्व पंचनामा केला आहे.

त्यानंतर माझ्यात व लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे यांच्यात फोनव्दारे झालेल्या संपर्कानुसार त्यांची व माझी भेट सटाणा शहरातील ताहराबाद नाका/दोधेश्वर नाका याठिकाणी होणार असल्याने पोलीस निरीक्षक संदीप घुगे यांनी माझेकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला, पंच क्रमांक 1 श्री. प्रदिप जाधव यांचेसह सटाणा शहरातील ताहराबाद नाका/दोधेश्वर नाका याठिकाणी रवाना केले व तेथे पोलीस निरीक्षक श्री. घुगे यांनी सापळा आयोजित केला. त्यावेळी सटाणा शहरातील ताहराबाद नाका/दोधेश्वर नाका याठिकाणी माझी व लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे यांची भेट झाली. त्यावेळी त्यांचेत व माझ्यात माझ्या वडीलांच्या वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयक मंजुरीच्या फाईलवर त्यांनी जावक क्रमांक टाकला अगर कसे ? याबाबत चर्चा झाली असता त्यांनी माझ्या वडीलांच्या दोन्हीही मेडीकल बीलच्या फाईल ओ.के होऊन जातील असे सांगुन त्यांना मालेगावला जाण्यास घाई होत असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांनी मागणी केलेली पाचशे रूपये लाचेची रक्कम त्यांच्या समोर धरून '' तुम्ही सांगितल्याप्रमाणे हे पाचशे रूपये '' असे म्हणालो असता त्यांनी ओ.के, ठिक ये चालेल असे म्हणुन मागणी केलेली लाचेची रक्कम सटाणा शहरातील राष्ट्रीय महामार्ग 752जी वरील ताहराबाद नाका/दोधेश्वर नाका याठिकाणी राम-रुख्मिणी कॉम्प्लेक्स मधील गवळी भेळ सेंटरच्या समोर सार्वजनिक रस्त्यावर दिनांक 10/01/2025 रोजी 14:42 वाजता स्विकारली. त्यानंतर मी लागलीच लाच स्विकारले बाबत पुर्वनियोजित
शारा केला. त्यानंतर सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक संदीप घुगे व सापळा पथकातील सदस्य आले त्यांनी लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे यास सदर ठिकाणी त्यांची ओळख देवुन त्याचे नांव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव रविंद्र दगा म्हसदे, वय- 48 वर्षे, धंदा- नोकरी, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती बागलाण (सटाणा) सध्या राहणारः- न्यु प्लॉट, कचेरी रोड, सटाणा, ता. बागलाण, जि. नाशिक याठिकाणी भाडेतत्वावर, मुळ राहणारः-



Scanned with OKEN Scanner

पिंपळगाव (दाभाडी), समाज मंदिराजवळ, ता. मालेगांव, जि. नाशिक असे सांगितले. सदर बाबत यशस्वी लाचेचा सापळा कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दिनांक 10/01/2025 रोजी लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती बागलाण (सटाणा) यांनी माझ्या वडीलांच्या वैद्यकिय खर्च प्रतिपुर्ती देयक मंजुरीच्या फाईल गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, बागलाण येथुन शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडे जावक क्रमांक नोंदवुन माझ्या ताब्यात देण्याच्या मोबदल्यात माझेकडे 500/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दिनांक 10/01/2025 रोजी 14: 42 वाजता सटाणा शहरातील राष्ट्रीय महामार्ग 752जी वरील ताहराबाद नाका/दोधेश्वर नाका याठिकाणी राम-रूख्मिीनी कॉम्प्लेक्स मधील गवळी भेळ सेंटरच्या समोर सार्वजनिक रस्त्यावर माझेकडुन स्विकारले म्हणून माझी लोकसेवक नामे रविंद्र दगा म्हसदे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती बागलाण (सटाणा) यांचेविरूध्द फिर्याद आहे.

माझी वरील टंकलिखीत केलेली फिर्याद मी वाचुन पाहिली ती मी सांगीतले प्रमाणे व घडल्या घटनेप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BAJIRAW MAHADEV POWAR(I (Inspector)) / 100 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** BAJIRAW MAHADEV
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 100



Scanned with OKEN Scanner